|| अंतरी पेटवू ज्ञाज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४-क/ रासेयो व वि.वि /रक्तदान शिबीर/ ५१ /२०२१ दि.३०/०४/२०२१

**प्रति,**

**१)मा. प्राचार्य/ संचालक/विभाग प्रमुख,महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग...**

**२)मा. प्राचार्य/संचालक/विभाग प्रमुख, राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक असलेले महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग...**

**विषय** :-कोरोना-१९ जनजागृती व रक्तदान शिबीर आयोजीत करणे बाबत...

**संदर्भः-** महामहिम राज्यपाल महाराष्ट्र शासन यांचा संदेश.

**महोदय / महोदया,**

मा.भगत सिंह कोश्यारी,महामहिम राज्यपाल तथा विद्यापीठ कुलपती ,महाराष्ट्र राज्य यांनी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांच्या मा.कुलगुरु समवेत ऑनलाईल सभेचे आयोजन केले होते.त्यात त्यांनी विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालया मार्फत राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व राष्ट्रीय छात्र सेना (NCC) स्वंयसेवकांच्या मदतीने कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) या संसर्गजन्य आजाराविषयी नागरीकांमध्ये जनजागृती करावी, रक्तदान करण्यास व तद्नंतर लस घेण्यास विद्यार्थी व नागरीकांना प्रेरीत करावे तसेच आपल्या परिसरात व गावात रक्तदान शिबीरांचे आयोजन करावे असे सुचित केले आहे.

प्रस्तुत अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की,आपल्या महाविद्यालय,मान्यताप्राप्त परिसंस्था व प्रशाळा,रासेयो एककांनी राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व राष्ट्रीय छात्र सेना (NCC) स्वंयसेवकांच्या मदतीने कोरोना विषाणू ( कोव्हिड-१९ ) या संसर्गजन्य आजाराविषयी नागरीकांमध्ये जनजागृती करावी, रक्तदान करण्यास व तद्नंतर लस घेण्यास नागरीकांना प्रेरीत करावे तसेच मोठया प्रमाणावर रक्तदान शिबीरांचे आयोजन करावे . रक्तदान शिबीर आयोजन करतांना कोव्हिड-१९ संदर्भात केंद्र,राज्य व स्थानिक प्रशासन यांच्या सुचनांचे पालन करावे (सामाजिक अंतर ठेवणे,मास्क लावणे,५० पेक्षा जास्त व्यक्तीचा समूह जमू न देणे, सॅनिटाईझरचा वापर करणे,शरीराचे तापमान तपासणे,स्वच्छता इत्यादी) कृपया आपण आपल्या परिसरात व गावामध्ये शासकीय आरोग्य विभाग अथवा मान्यता प्राप्त रक्तपेढी यांच्या सहकार्य व मार्गदर्शनातून रक्तदान शिबीराचे आयोजन करुन आयोजनाचा अहवाल खालील नमुन्यात सादर करावा. तसेच या अभियानातून कोव्हिड मुक्त पात्र व सशक्त प्लाझ्मादाते यांना आवाहन व संपर्क करुन प्लाझ्मादात्यांची सूची तयारी करावी.

**महाविद्यालयाचे / रासेयो एककाचे नांवः-**

**रक्तदान माहिती**

| दिनांक | रक्तदान शिबीर स्थळ | रक्तपेढीचेनाव | इच्छुक रक्तदात्यांची संख्या | रक्तदान पिशवी संख्या |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**प्लाझ्मादात्यांची सुची**

| **प्लाझ्मादाता नाव व पत्ता** | संपर्क क्रमांक | इ-मेल |
|---|---|---|
| | | |

आपला अहवाल, निवडक वृत्तपत्र कात्रण व छायाचित्र विद्यापीठाच्या nss@nmu.ac.in या ई- पत्यावर सादर करावीत जेणे करुन रक्तदान शिबीर आयोजनाची माहिती एकत्रितरित्या केंद्र व राज्य शासन कार्यालयास सादर करणे सुकर होईल,हि विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.पंकजकुमार शां.नन्नवरे )
संचालक,राष्ट्रीय सेवा योजना
व प्र.संचालक, विद्यार्थी विकास

**प्रतिलिपीः-**

१) मा. अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,जळगाव.२) मा.अधिष्ठाता, हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,धुळे. ३) मा.शल्यचिकीत्सक ,जिल्हा सामान्य रुग्णालय,जळगाव.४) मा.शल्यचिकीत्सक ,जिल्हा सामान्य रुग्णालय,धुळे . ५) मा.शल्यचिकीत्सक ,जिल्हा सामान्य रुग्णालय,नंदुरबार. ६) जिल्हा समन्वयक व विभागीय समन्वयक रासेयो व वि.व-कृपया आपल्या क्षेत्रातील रासेयो एककांना रक्तदान शिबीरे आयोजित करण्यास व प्लाझ्मादात्यांची सूची तयारकरण्यास प्रेरीत करावे व अहवाल पाठविण्या विषयी कार्यवाही करावी.

**प्रत :-**१) मा.राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र शासन, मुंबई २)मा.प्रादेशिक संचालक,राष्ट्रीय सेवा योजना प्रादेशिक कार्यालय,पुणे ३) विभाग प्रमुख,कुलगुरु कार्यालय,४) विभाग प्रमुख,प्र-कुलगुरु कार्यालय,५) विभाग प्रमुख,कुलसचिव कार्यालय

11:39

# Governor of Maharashtra

Governor Bhagat Singh Koshyari asked vice chancellors of all state universities in Maharashtra to remain in the forefront of the fight against the COVID – 19 pandemic and offer their support to civic administration.

He called upon the vice chancellors to involve Student Unions alongside volunteers of NSS and NSS Cadets in organizing awareness programmes and blood donation camps.

Vice Chancellors of the universities apprised the Governor of the work being done by them for society during the ongoing pandemic situation.

Rate this translation



Write a comment...